स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

मानवविद्या शाखेअंतर्गत ‘राज्यशात्र’ विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवीकरिता सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा प्राथमिक आराखडा

“पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परराष्ट्र धोरणाचा तुलनात्मक अभ्यास”

संशोधक

कैलास मुंजाजी नरवाडे

एम.ए, (राज्यशात्र)

मार्गदर्शक

प्रा.डॉ.प्रताप वामनराव पाटील

एम.ए,बि.एड,एम.फिल,पीएच.डी

सहयोगी प्राध्यापक तथा संशोधन मार्गदर्शक

राज्यशात्र विभाग प्रमुख

बहिर्जी स्मारक महाविद्यालय,वसमत जि.हिंगोली

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज,नांदेड

ऑगस्ट २०२३

:: अनुक्रमणिका ::

01	प्रास्ताविक	
02	संशोधन विषयाची आवश्यकता	
03	संशोधन समस्यासूत्रण	
04	संशोधनाचे महत्त्व	
05	संशोधनाची उद्दिष्टे	
06	संशोधनाची गृहितके	
07	संशोधन पद्धती	
08	तथ्ये संकलन	
09	संशोधनाची मर्यादा व व्याप्ती	
10	संशोधन आराखडा	
11	संदर्भसूची	

“पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परराष्ट्र धोरणाचा तुलनात्मक अभ्यास”

प्रास्ताविक :

भारताच्या परराष्ट्र धोरणाचा पाया पंडित जवाहरलाल नेहरू यांनी रचला आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पंतप्रधान म्हणून त्यांनी स्वतंत्र भारताची धुरा सांभाळली आणि सोबतच परराष्ट्र मंत्री म्हणूनही काम पाहिले.स्वातंत्र्याच्या पूर्व काळापासूनच त्यांना आंतरराष्ट्रीय संबंधात रस असल्याचा व अभ्यास असल्याचा दिसून येतो.ब्रिटन आणि पश्चिम,मध्ये देशाच्या वसाहतवादाला त्यांचा विरोध होता.वसाहतवादाचा अंत व आशिया,आफ्रिका खंडातील देशाची एकजूट,विश्वशांतीचा पुरस्कार,अलिप्ततावादी राष्ट्राची संघटना हे त्यांनी घालून दिलेल्या परराष्ट्र धोरणाचे प्रमुख पैलू असून तेच असे आदर्शवादी परराष्ट्र धोरण त्यांनी अवलंबलेले दिसून येते.१९४७ ते १९६२ हा कालखंड नेहरूजींच्या राजकीय कारकीर्दीचा मानला जातो.परराष्ट्र धोरणाची पायाभरणी स्वातंत्र्यलढ्याच्या काळात झालेली असली तरी या तत्त्वांना विकसित करण्यात पंडित जवाहरलाल नेहरू यांचे योगदान महत्त्वाचे आहे.

२६ मे २०१४ रोजी नरेंद्र मोदी यांनी भारताच्या पंतप्रधान पदाची सूत्रे हाती घेतली त्यानंतर त्यांच्या कालखंडात शेजारील राष्ट्राशी असलेले संबंध आणि इतर राष्ट्राशी प्रस्थापित केलेली संबंध हे त्यांच्या परराष्ट्र धोरणाचे महत्त्व अधोरेखित करतात.त्यांच्या सरकारला शंभर दिवस पूर्ण झाली होती त्या काळात त्यांनी भूतान नेपाळ आणि जपान या राष्ट्रांना अधिकृत भेटी दिल्या त्यानंतर त्यांनी इतर राष्ट्राच्या भेटी घेऊन व्यवसायिक संबंध वाढविण्याचे प्रयत्न केले. नरेंद्र मोदी यांनी नेहरूची आदर्शवादी परराष्ट्र धोरण बाजूला सारून वास्तववादी परराष्ट्र धोरणाकडे अधिक लक्ष दिल्याचे दिसून येते.अमेरिका,रशिया,इज्राईल,नेपाळ,भूतान या राष्ट्राची त्यांनी केलेल्या अनेक व्यवसायिक करारामधून त्यांची परराष्ट्र धोरण दिसून येते.त्यांच्या परराष्ट्र धोरणाचा कालखंड २०१४ ते आजपर्यंत असा कालखंड सांगता येतो.पंडित जवाहलाल नेहरू यांची परराष्ट्र धोरण हे आदर्शवादी असल्याचे तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची परराष्ट्र धोरण वास्तवाशी निगडित असल्याचे दिसून येते.

पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी जागतिक शांतता व सहकार्यावरभर दिला होता.पंडित जवाहलाल नेहरू यांना भारताच्या परराष्ट्र धोरणाची उदय संचालक असे म्हटले जाते स्वातंत्र्यानंतर पहिली १८ वर्षे ते भारताचे पंतप्रधान होते आपल्या पंतप्रधान पदाच्या कारकिर्दीत परराष्ट्र खाते ही त्यांनी स्वतः सांभाळली होती १९६२ च्या चीन भारत संघर्षापूर्वी त्यांनी आंतरराष्ट्रीय शांतता सहकार्य अलिप्तवाद यांच्या साह्याने भारताला राज नाईक प्रतिष्ठेचे संरक्षण कवच संपादन करण्यावर भर दिला होता नेहरूंनी परराष्ट्र धोरणाचा राज्य केंद्रीय नव्हे तर आंतरराष्ट्रवादी दृष्टिकोनातून विचार केला होता.“डॉ.पद्मकुमार दुभाषी यांच्या एका लेखात ते लिहितात की पंडित जवाहरलाल नेहरू यांनी दिलेली भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचे स्वरूप आदर्शवादी होते परंतु

भारताच्या हिताची असेल असेही त्यांना प्रामाणिकपणे वाटत होते" भारताच्या परराष्ट्र धोरणामुळे जागतिक मंचावर विश्वशांतीसाठी झटणारा देश म्हणून भारताला मान्यता मिळाली.अलिप्तवादाच्या जोडीला नवीन जागतिक अर्थरचनेची कल्पनाही भारताने पुढे म्हणली व अॅक्टरच्या माध्यमातून त्याला मूर्तस्वरूप देण्याचा प्रयत्न केला.जगातील अविकसित देश यांच्या जीवनमानातील सुधारणा व्हावी अविकसित देशाची आर्थिक प्रगती व्हावी यासाठी विकसित देशांनी आपल्या राष्ट्रीय उत्पादनाचा एक टक्का एवढी तरी आर्थिक मदत करावी व समानतेच्या तत्त्वावर नवीन जागतिक अर्थव्यवस्था स्थापन करावी असा विचार होता.जर्मनीचे निवृत्त चान्सलर विली ब्रँट यांच्या या नोर्थ साऊथ कोऑपरेशन हा महत्त्वाचा अहवाल या विचारावर आधारित होता एकूणच काय तर शांततावादी अलिप्ततावादी धोरण पंतप्रधान पंडित जवाहलाल नेहरू यांची होते.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे शांततावादी धोरण पुढे ठेवले पण युरोपियन राष्ट्राशी संबंध प्रस्थापित करताना वास्तववादाचा विसर पडू दिला नाही अशी दिसते पूर्व आशिया आणि दक्षिण पूर्व आशिया धोरण युरोपियन राष्ट्राशी संबंध या संदर्भातील त्यांचे धोरण वास्तववादाला धरून आखलेले दिसते.

परराष्ट्र धोरणात काळाप्रमाणे बद्दल होणे आवश्यकच असते वर्तमान भारतीयराजकार अनेक विषयावर बदललेले दिसून येते. देशात जम्मू-काश्मीर घाटी मधील चालणारी संचारबंदी,भारतातील होणारे दहशतवादी हाले,भारतीय आर्मी स्थलावरील हाले.प्रतिउत्तर म्हणून भारताने केलेली सर्जिकल स्ट्राइक,सातत्याने पाकिस्तानकडून होणारी शस्त्रसंधीचे उल्लंघन.इत्यादी प्रश्नाना सामोरेजात असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी याच्या काळातील भारताचे परराष्ट्र धोरण आत्मविश्वासी आर्थिक हितसंबंधावर आधारित असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अतिशय कमी कालावधीत भारतीय परराष्ट्र धोरणावर आपला दबदबाव निर्माण केला आहे.

संशोधन विषयाची आवश्यकता: (Importance of the Study)

"पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू व पंतप्रधाननरेंद मोदी यांच्या परराष्ट्र धोरणाचा तुलनात्मक अभ्यास" या संशोधन विषयाच्या अभ्यासाला सुरुवात करण्यापूर्वी या अभ्यासाची गरज प्रतिपादन करणे आवश्यक आहे.राष्ट्राच्या विकासात परराष्ट्र धोरणाला अनन्य साधारण महत्व आहे.भारताच्या परराष्ट्र धोरणाचा विचार केल्यास पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पंचशील तत्वाचा प्रभाव असल्याचे दिसून येते.तर साध्य स्थितीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे परराष्ट्र विषयक धोरण पाहता त्यांचे अनेक देशांशी असलेले मैत्रीपूर्ण संबंध, त्याच्या नेतृत्वाची जगावर पडलेली छाप इत्यादी बाबीनच नव्याने अभ्यास गरजेचे वाटते.भारतापुढील आजच्या वर्तमान काळात व उद्याच्या भविष्यकाळातही भेडसावत असलेल्या परराष्ट्र विषयक विविध प्रश्नावर उपाययोजना राबविण्याच्या असतील तर सखोल आणि मूलगामी असे भारताला आपले शेजारील राष्ट्रांसोबतचे धोरण अवलंबावे लागेल त्यासाठी वरील विषयावर आधारित संशोधनाची आवश्यकता आहे तथापि अनेक विषयांना स्पर्श करून या संशोधनाची आवश्यकता पूर्ण करणे हा माझा मानस राहील.

संशोधन समस्यासूत्रण :

भारताचे परराष्ट्र धोरण शेजारील राष्ट्राशी संबंध विज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रगती,चीन आणि पाकिस्तान या शेजारील राष्ट्रांचे बदललेले परराष्ट्र धोरण या जागतिक महसत्ता असलेल्या अमेरिकेची भारताकडे पाहण्याची भूमिका अमेरिका आणि रशिया या राष्ट्राची भारताची असलेली संबंध इत्यादी बाबी. तसेच पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या परराष्ट्र धोरणामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताची अलिप्तवादी भूमिका शांततावादी धोरण हे वर्तमान काळात कितपत योग्य राहील. जागतिक कुरघोडीच्या राजकारणात सत्ता स्पर्धा सशस्त्र स्पर्धेत विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीत भारताने आपली परराष्ट्र धोरण कशी आखली आहे. किंवा आपली पाहिजे हे तितकेच महत्वाचे ठरते. देशातील आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी तसेच देशाच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी परराष्ट्र धोरण आखले जाते याचा अर्थ प्रस्तुत संशोधनांमधून करायचा आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणामध्ये पंडित जवाहरलाल नेहरू यांचा सिंहाचा वाटा आहे असे म्हटले जाते तरीही आज सुद्धा परराष्ट्र धोरणावर आपला देश अवलंबून आहे का ? याचा सुद्धा आपणास अभ्यास करावा लागणार आहे. आज सुद्धा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली परराष्ट्र धोरण कश्या प्रकारे कार्य करत आहेत हे सुद्धा आपणास या ठिकाणी संशोधनाच्या माध्यमातून पहावी लागणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या शपथपत्रात म्हटली होती की भारताला आपल्या सहकारी देशाची नेटवर्क जाळी विकसित करायचे आहे ते कशाप्रकारे काम चालू आहे याचा अभ्यास आपणास संशोधनाच्या माध्यमातून करायचा आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व : (Significance of the Study)

पंतप्रधान पंडित जवाहलाल नेहरू व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परराष्ट्र धोरणाचा तुलनात्मक अभ्यास या प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने संशोधन करण्यापूर्वी सादरीन विषयाचे महत्त्व विशद करणे, प्रमाणबद्ध ठरते राष्ट्राचे अखंडत्व कायम ठेवून चांगल्या राष्ट्राची निर्मिती करण्यासाठी जनतेला राष्ट्रवादाची भावना तीव्र असावी लागते पंतप्रधान पंडित जवाहलाल नेहरू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्र उभारणीसाठी केलेल्या कार्याचा आणि परराष्ट्र धोरणाचा अभ्यास केला जाणार आहे पंडित जवाहलाल नेहरू यांचे तात्कालीन धोरण वर्तमान काळात किती उपयोगी पडते याचाही अभ्यास करणे तितकेच महत्त्वाची आहे कारण त्यांचे विचार हे काळाच्या पलीकडची होती त्यांना देशाच्या परिस्थितीचा चांगला अभ्यास होता वर्तमान काळात त्यांच्या विचाराची तशी गरज आहे हे लक्षात येते पंडित जवाहरलाल नेहरू यांची परराष्ट्र धोरणासंबंधी महत्त्वाची योगदान आहे तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कालखंडातील परराष्ट्र धोरण देशाच्या आधुनिकीकरणाला किती उपयुक्त आहे याचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात केला जाणार आहे नरेंद्र मोदी यांच्या कालखंडात हटवलेले ३७० वे कलम काश्मिरी प्रश्न पाकिस्तानी आणि चीनची भूमिका महासत्ताक राष्ट्राची केलेली करार शस्त्रास्त्र स्पर्धेत टिकण्यासाठी युरोपियन राष्ट्राची केलेले करा विशेषता फ्रान्स सोबत केलेला करा चीनविषयक

धोरण या सर्वाचा अभ्यास करणे हे प्रस्तुत संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते या संशोधनातून सत्यापर्यंत जाण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनांमधून केला जाणार आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :(Objective of Reserch)

प्रस्तुत शोध प्रबंधासाठी खालील उद्दिष्टे घेतली आहेत.

१) भारताच्या परराष्ट्र धोरणाची पार्श्वभूमी अभ्यासणे .
२) स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून पंडित जवाहरलाल नेहरूयांच्या परराष्ट्र धोरणाचे स्वरूप अभ्यासणे.
३) भारताच्या अलिप्ततावादी धोरणाचा जागतिक परिणामाचा अभ्यास करणे.
४) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील भारताच्या बदलत्या परराष्ट्र धोरणाचा आढावा घेणे.
५) पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कालखंडातील शेजारील देशाबरोबर असलेल्या संबंधाचा शोध घेणे.
६) जागतिकीकरणाच्या साध्यस्थितीत भारताच्या आर्थिक वृद्धी व विकासाला चालना देणाऱ्या परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके : (Hyposthesis of Reserch)

प्रस्तुत संशोधनासाठी खालील गृहितके लक्षात घेतली आहेत

1) पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार मानले जातात.
2) पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे परराष्ट्र धोरण अलिप्ततावादाचा पुरस्कार करणारे होते.
3) पंतप्रधान नरेंद मोदी यांच्या परराष्ट्र धोरणावर राष्ट्रवादाचा प्रभाव दिसून येतो.
4) पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू व पंतप्रधान नरेंद्र मोदी या दोन्ही नेत्यांच्या कालखंडातील शेजारील राष्ट्राशी संबंधा बाबात भिन्नता आहे.
5) पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू व पंतप्रधान नरेंद्र मोदी या दोन्ही नेत्यांच्या परराष्ट्र धोरणातून भारताला जागतिक स्थरावर महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

संशोधन पद्धती: (Reserch Methodology)

प्रस्तुत संशोधनाचा “पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परराष्ट्र धोरणाचा तुलनात्मक अभ्यास” हा विषय असून परराष्ट्र धोरणाची, राष्ट्रवादी प्रश्नांची उकल करण्यासाठी सामाजिक संशोधन ही शास्त्रीय प्रक्रिया असून यातून सामाजिक प्रश्नांना दिशा मिळत असते. पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू व नरेंद्र मोदी यांच्या परराष्ट्र धोरणाचा तुलनात्मक अभ्यास असल्यामुळे संशोधनासाठी काही विचारवंताच्या मताचे स्पष्टीकरण करण्यासाठी विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब केल्या जाणार आहे. तसेच प्रस्तुत संशोधनाची मांडणी करत असताना सर्वसाधारणपणे सामाजिक शास्त्रात वापरल्या जाणाऱ्या संशोधन पद्धतीचा व राजकीय विचारवंताच्या वैचारिक लेखनाचा आधार मूळ स्त्रोत म्हणून घेतला जाणार आहे. केवळ चरित्रात्मक लिखाण अभिप्रेत नसल्यामुळे ऐतिहासिक, वर्णनात्मक पद्धतीचा स्वीकार केला जाणार आहे. सदरील संशोधन हे सामाजिक शास्त्र पद्धतीचे असून प्रथम व दुय्यम स्त्रोतांवर आधारित असणार आहे. प्रस्तुत संशोधनासाठी प्रथम व दुय्यम दर्जाचे संदर्भ साहित्य घेऊन वर्णनात्मक, विश्लेषणात्मक व निदानात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला जाणार आहे.

तथ्ये संकलन :

१) प्राथमिक तथ्ये :

प्रस्तुत संशोधन विषयासाठी प्राथमिक तथ्ये महत्वाची असून यामध्ये पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू व पंतप्रधान नरेद्र मोदी यांच्या परराष्ट्र धोरणाचा सबंधित संसदेतील अभिलेख,विविध समित्यांचे अहवाल,भारत सरकारची विविध शासकीय प्रकाशने दोन्ही नेत्यांची संसदेतील परराष्ट्र सबंधित भाषणे,तत्कालीन या नेत्यांनी दिलेल्या विविध मुलाखतीचे रेकार्ड इत्यादींचा अभ्यास प्राथमिक तथ्ये म्हणून करण्यात येणार आहे.

२) द्वितीय तथ्ये :

प्रस्तुत संशोधन हे दुय्यम आधार सामग्रीवर अवलंबून आहे .यामध्ये तात्कालीन परराष्ट्र धोरणाशी संबंधित परराष्ट्र मंत्रालयातील करार,परराष्ट्र धोरणाशी संबंधित कागदपत्रे, भारत सरकारची विविध शासकीय प्रकाशने इत्यादींचा समावेश करण्यात येणार आहे. तसेच संशोधन विषयासंबंधीचे संदर्भ ग्रंथ, विविध नियतकालिकातील आणि स्मरणिकांतील संशोधन पर लेख,महाजालावरील संशोधन पर साहित्य, पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यावर विविध लेखकांनी लिहिलेल्या ग्रंथाचा अवलंब करण्यात येणार आहे, तसेच नरेंद्र मोदी यांच्यावर लिहिलेल्या पुस्तकांचाही

अभ्यास केला जाणार आहे. तत्कालीन वर्तमानपत्रातील विश्लेषण तसेच दोन्हीही नेत्यांच्या काळातील निवडणुकीचे वर्तमानपत्रातील विश्लेषण अशा विविध दुय्यम स्त्रोतांचा अवलंब प्रस्तुत संशोधनासाठी तथ्य संकलन करण्यात येणार आहे.

संशोधनाची मर्यादा व व्याप्ती : (Limitations of Reserch)

भारताच्या परराष्ट्र धोरण अभ्यसत असताना प्रतेक पंतप्रधानाने आपल्या काळात देशाचे परराष्ट्र धोरण मजबूत करण्याचा प्रयत्न केला आहे.प्रस्तुत संशोधनात पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकिर्दीतील परराष्ट्र धोरणा अभ्यासणे ही संशोधनाची व्याप्ती राहणार आहे. तर संशोधन विषयाच्या अनुषगाने अनेक देशांशोबत झालेले परराष्ट्र व्यवहार त्याची गोपनीयता राखणे ही प्रस्तुत संशोधना कार्याची मर्यादा राहणार आहे.

संशोधनाचा आराखडा : (Reserch Design)

पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परराष्ट्र धोरणाचा तुलनात्मक अभ्यास या शीर्षकाच्या अनुषंगाने केलेली लिखाण अधिक सूत्रबद्ध होण्यासाठी प्रस्तुत संशोधनाच्या प्रकरणाची आखणी पुढील प्रमाणे केली आहे

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रस्तुत संशोधन विषयांसंदर्भात यापूर्वी या विषयावर केल्या गेलेल्या वेगवेगळया संशोधनाचा,शोध प्रबंधाचा, भारत सरकारने केलेले कायदे, प्रांतिक विधिमंडळाने केलेले कायदे, आत्मचरित्र, मासिके, साप्ताहिक मधील विविध लेख, वर्तमानपत्रे, प्रकाशित केलेल्या स्मरणिका या स्वरूपच्या ग्रंथांचा वापर योग्य त्या ठिकाणी केला जाईल. त्याचबरोबर राज्यशास्त्रातील विविध संदर्भ ग्रंथाचाही आधार घेतला जाईल. प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक असणारी संशोधन पद्धती विषयाचे महत्त्व समस्या सूत्रंन,विषयाची आवश्यकता,संशोधनाची उद्दिष्टे,संशोधनाची गृहीतके,संशोधन आराखडा,मुलाखत,नमुना निवड इत्यादी संशोधनात्मक बाबींची मांडणी करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे : पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे जिवनकार्य

प्रस्तुत प्रकरणात पंडित जवाहलाल नेहरू व नरेंद्र मोदी यांच्या जीवनकार्याचा आढावा घेण्यात येणार आह. तसेच त्यांच्यावर झालेला प्रभाव,कौटुंबिक परिस्थिती,शिक्षण, राजकीय प्रवास इत्यादी घटकाचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : पंडित जवाहलाल नेहरू यांचे परराष्ट्र धोरण

प्रस्तुत प्रकरणात पंडित जवाहलाल नेहरू यांची परराष्ट्र धोरण १९४७ ची भारत पाकिस्तान फाळणी आणि पंडित जवाहलाल नेहरू यांची भूमिका अलिप्तवादी धोरण,भारताच्या उभारणीतील योगदान,भारत-रशिया,भारत-चीन,भारत-पाक,इत्यादी देशाशी असलेले सबंध भारताची युनो बाबत भूमिका,भारताची शांततामय सहकार्याची भावना, पंडित जवाहलाल नेहरू यांचे काश्मीर प्रश्नासंबंधी भूमिका.अभ्यासणार आहोत.

प्रकरण चौथे : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे परराष्ट्र धोरण

प्रस्तुत प्रकरणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे परराष्ट्र धोरण पाहत असताना असे प्रतीत होते की त्यांनी केलेल्या विविध देशान सोबतच्या मैत्रीपूर्ण संबधातून भारताला जागतिक स्थरावर महत्त्व.या प्रकरणात त्यांनी घेतलेले निर्णय,इतर देशांसोबत केलेले करारक, अंतराष्ट्रीय परिषदे मध्ये घेतलेला सहभाग व त्यामधील भूमिका अशा विविद्ध बाबींचा भारताच्या परराष्ट्र धोरनावर झालेला परिणाम.शेजारील देशांसाबंधी त्यांनी घेतलेली भूमिका इत्यादी गोष्टीचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे : पंडित जवाहरलाल नेहरू व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परराष्ट्र धोरणाचा तुलनात्मक अभ्यस

प्रस्तुत प्रकरणात दोन्ही नेत्याच्या परराष्ट्र धोरणाचा अभ्यस करण्यात येणार असून भारताचे पहिले म्हणून पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारताचे परराष्ट्र धोरनाचा पाया घालत असताना अनेक धोरणात्मक निर्णय घेतल्याचे दिसून येते.तरनरेद्र मोदी यांनी भारताचे पंतप्रधान झाल्यापासूनच भारताच्या परराष्ट्र धोरणावर भर दिल्याचे दिसून येते. या दोन्ही नेत्यांच्या परराष्ट्र धोरणाचा तुलनात्मक अभ्यास या प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे : निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरणात संशोधन अंती निष्कर्ष काढण्यात येतील व आवशक असल्यास सिफारशी करण्यात येतील

टीप:

वरील प्रमाणे शोध प्रबंधाचा प्राथमिक आराखडा असून आवशकता असल्यास काही बद्दल केला जाऊ शकतो.

संदर्भ सूची:

१) देवळणकर शैलेंद्र,'भारतीय परराष्ट्र धोरण सत्यता आणि स्थितांतर',प्रतिमा प्रकाशन, पुणे.

२) देवळणकर शैलेंद्र,'समकालीन जागतिक राजकारण भारताच्या परराष्ट्र आणि संरक्षण धोरणापुढील आव्हाने',विद्या बुक पब्लिकेशन, औरंगाबाद (2014).

3) पाटील वा.भा.आंतरराष्ट्रीय संबंध',प्रशांत पब्लिकेशन जळगाव,2011.

४) शैलेंद्र देवळणकर 'अमेरिकेचे शीतयुद्धोतर दक्षिण आशिया धोरण भारत आणि आंतरराष्ट्रीय भूराजकारण समाज प्रबोधन पत्रिका खंड.

५) 'भारताचे परराष्ट्र धोरण' के'सागर पब्लिकेशन, पुणे.

६) नाईकवाडे ए.बी,'भारताचे परराष्ट्र धोरण',स्टडी सर्कल पब्लिकेशन, मुंबई.

७) देवळणकर शैलेंद्र,'भारताचे परराष्ट्र धोरण', विद्या बुक पब्लिकेशन, औरंगाबाद.

८) वराडकर र.घ,'भारताचे परराष्ट्र धोरण', विद्या प्रकाशन नागपूर.

९) शिंदे ज.रा, 'भारताचे परराष्ट्र धोरण', कैलाश प्रकाशन औरंगाबाद.

१०) वाघ एस.एम,'भारत:शेजारील राष्ट्रे आणि परराष्ट्र धोरण',अथर्व पब्लिकेशन,जळगाव.

११) पवनकुमार,'भारत की विदेश नीती',ओमेगा पब्लिकेशन,दिल्ली.

१२) दीक्षित जे.एन,'भारतिय विदेश नीती',प्रभात पब्लिकेशन,दिल्ली,२००४.

13) पंथ पुष्पेश, 'भारत की विदेश नीती',सायमा पब्लिकेशन,नई दिल्ली.

१४) गुर्जर संकल्प,'देशांतर्गत राजकारणासाठी परराष्ट्र धोरण' पुणे. (४ जून २०१६)

१५) साधन साप्ताहिक,पान नं ११,वर्ष ६८ ,अंक ४३.

१७) नवलाख गौतम,काश्मीर शोकांतिका व प्रश्न परिवर्तनाचा,वाटस्वरुप (२०१६)..

१८) राजपत करिअर टाइम्स - जानेवारी २०१६ पान क्र १८.

१९) वर्तमानपत्रे आणि मासिके :-

द हिंदू, इंडियन एक्सप्रेस, टाइम्स ऑफ इंडिया, हिंदुस्तान टाइम्स,

इंडिया टुडे, इकॉनॉमिक्स टाइम्स, फायनान्शियल एक्सप्रेस,

दै. लोकसत्ता, दै.सकाळ, क्रॉनिकल.

२०) Bhattacharya W.C.An out line of world politics,Vijaya publishing house,Baroda, 1971

२१) kaul T.N., India's and the New World order, Gyan publishing house, New Delhi. 2000

२२) kuntambkar S.V,The foreign policy and Indian union, Padmaji publication, Baroda. 1948

२३) Nanda B.R., India's foreign policy the Nehru years, Vikas publication, New Delhi. 1976

२४) Trivedi Ramesh, India Relations With Neighbour,Isha Books,New Delhi,2008

२५)WWW. Foreignpolicy.com

संशोधक

कैलास मुंजाजी नरवाडे

एम.ए, (राज्यशास्त्र)

ID-kailas.narwade444@ gmail.com

मो.न.९९७०२७०१५३

मार्गदर्शक

प्रा.डॉ.प्रताप वामनराव पाटील

एम.ए,बि.एड,एम.फिल,पीएच.डी

सहयोगी प्राध्यापक तथा संशोधन मार्गदर्शक

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

बहिर्जी स्मारक महाविद्यालय,वसमत,जि. हिंगोली